**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२०/२०२२</u>**
**<u>वादीतर्फे सा.क्र.१</u>**
**<u>निशाणी क्र.३५  वर पुढे सुरु...</u>**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांच्यामार्फत उलटतपासः</u>**

गट क्र.२३३ या शेतीचे माझ्या वडीलांपासून फेरफार उतारे मी पाहिलेले आहेत. सन २०१३ मध्ये गट क्र.२३३ मधील ८१ आर शेत हे प्रतिवादी क्र.१ यानी अविनाश गोपाळराव खंडारे यांच्याकडून विकत घेतलेले आहे अथवा कसे, याबाबत मला माहित नाही. त्याविषयी मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी अविनाश गोपाळ खंडारे यांच्याकडून विकत घेतलेल्या शेताबाबतचा फेरफार मी पाहिलेला नाही. गट क्र.२३३ या शेतीचे माझ्या वडीलांपासूनचे फेरफार उतारे मी पाहिलेले आहेत, ही बाब मी खोटी सांगितलेली नाही. गट क्र.२३३ हा जहागिर खान रसूल खान यांच्या नावावर कधी झाला त्याचा फेरफार मी पाहिलेला नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्नः** | गट क्र.२३३ ही जहागिर खान रसूल खान याच्या नावे झालेला फेरफार तुम्ही न पाहता प्रस्तुत दावा दाखल केला आहे, हे म्हणणे खरे आहे काय ? |
| **न्यायालयीन निरीक्षणः** | साक्षीदार हा प्रश्न विचारतांनाच प्रतिवादी यांचे विधीज्ञांना उलट प्रश्न करताना दिसून येतो तसेच न्यायालयाने व त्यांच्या विधीज्ञांनी प्रश्नांची उत्तरे प्रश्न ऐकुन देण्यास सांगितले असता देखील प्रश्नांची उत्तरे ही प्रश्नांशी सुसंगत देताना दिसून येत नाही. |
| **उत्तरः** | मला काहीच माहित नव्हतं. |

सदर दावा दाखल करण्यापुर्वी मी गट क्र.२३३ चा ७/१२ पाहिला होता. सदर ७/१२ पाहिल्यानंतर जहागिर खान यांचे नाव सदर ७/१२ वर कसे आले, याबाबत मी तलाठी कडे जावून चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, जहागिर खान रसूल खान याच्या नावे गट क्र.२३३ कसा आला, याबाबत मी कोणतीही चौकशी न करता प्रस्तुत दावा दाखल केला आहे. आता मला नि.क्र.१ दाखविण्यात आली. नि.क्र.१ च्या पान क्र.१ ते ९ च्या खालच्या भागावर केलेल्या सह्या दाखविण्यात आल्या. त्या सह्या माझ्या नाहीत.

आता मला यादी नि.क्र.६३ सोबत दाखल केलेला प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले. त्यावरील सरफराज खान रसुल खान हे नाव माझेच आहे. त्यावरील माझे मोठे भाऊ जहागिर खान रसूल खान यांचे नाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०२.०१.२००६ रोजी मी माझा भाऊ जहागिर खान रसूल खान याच्या लाभात गट क्र.२३३, क्षेत्र ० हे. ७१ आर यामधील माझा हिस्सा ४० आर रक्कम रु.४०,०००/– ला दिली, व मौजे पारस गाव येथील वडीलोपार्जीतची माझ्या हिश्शास येईल ती जागा रक्कम रु.२०,०००/– मध्ये दिली, व त्याबाबत मी माझे मोठे भाऊ जहागिर खान याचेकडून रु.६०,०००/– घेतले व माझा हक्क सोडून दिला, याबाबतचे प्रतिज्ञापत्र लिहून दिले होते. आता मला सदर मुळ प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही नाही. सदर प्रतिज्ञापत्र उलटतपासामध्ये दाखविण्यात आले असल्यामुळे त्यास **नि.क्र.६४** देण्यात येत आहे.

आता मला नि.क्र.२ कडील वकीलपत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही एस.आर. खान अशी आहे. आता मला यादी नि.क्र.६४ कडील प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले, त्यावर केलेली सही माझी नाही. मनसब खॉ शाहदत खॉ हे पारस येथील राहणारे होते, याबाबत मी त्यांना ओळखत नाही. मनसब खॉ शाहदत खॉ यांचे नि.क्र.६४ कडील प्रतिज्ञापत्रावर ओळखदार म्हणून नाव आहे, याबाबत मला माहित नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सदर दाव्यामध्ये दाखल केले त्याच्यासोबत नि.क्र.६४ च्या प्रतिज्ञापत्राची झेरॉक्स प्रत दाखल केली होती, ती प्रत मी वाचली नाही तसेच माझ्या वकीलांकडून ती समजून घेतली नाही. प्रतिवादी यांनी सदर दाव्यास दाखल केलेला लेखी जबाबातील मजकूर मी वाचून समजून घेण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कैफियतीमधील मजकूर काय आहे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, जर मी प्रतिवादी यांचा जबाब वाचला असता तर त्यातील मजकूराच्या अनुषंगाने संबंधित शेतीचे ७/१२ उतारे व फेरफार काढले असते.

मी सन १९८४ पासून चंद्रपुर येथे राहत आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही स्वतःच्या घरात राहता काय ? |
| **उत्तरः** | मी भाड्याच्या घरात राहतो. |

मी चंद्रपुर येथे राहावयास गेल्यापासून कधी–कधी पारस येथे येत असतो. पारस येथे आल्यानंतर मी माझा भाऊ जहागिर खान याच्या घरी राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पारस येथे आल्यानंतर माझ्या शेती गट क्र.२३३ ची चौकशी करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पारस येथील घराबाबत मी आज पर्यंत केस केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०२.०१.२००६ रोजी मी सदर प्रतिज्ञापत्र माझ्या भावाच्या लाभात केल्यामुळे मी सदर घराबाबत आजतागत केस केली नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | आज रोजी पारस येथील घर हे तुमच्या भावाच्या नावे आहे, हे खरे आहे काय? |
| **उत्तरः** | त्याबाबत मला माहित नाही. |

हे म्हणणे खरे आहे की, सदर घर कोणाच्या नावे आहे, याबाबत ग्रामपंचायत कार्यालयात जावून मी चौकशी केली नाही. सदर दावा दाखल करण्यापुर्वी जहागिर खान यांना माझे वकील रफीक एच. शेख यांच्याद्वारे पाठविलेल्या नोटीसचे उत्तर मला मिळाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीसीला पाठविलेले उत्तर मला न मिळता मी ती दाव्यामध्ये दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत गट क्र.२३३ यामध्ये माझा कोणताही हक्क व अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत यातील माझा हक्क व अधिकार माझा भाऊ जहागिर खान याच्या नावे मी दिलेला असताना देखील माझ्या वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसमध्ये त्यास रक्कमेची मागणी केली. सदर नोटीसीमध्ये किती रक्कमेची मागणी केली, याबाबत मला माहित नाही. सदर नोटीस तयार करताना मी माझ्या वकीलांना किती रक्कमेची मागणी करावयाची आहे, याबाबत सांगितल्याचे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीसीमधील मजकूर काय लिहीला आहे, हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा वाद मिळकत मध्ये कोणताही हक्क व अधिकार नसताना प्रतिवादी विरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेला मजकूर खोटा नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– २७.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.28 11:11:22 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २७/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २७/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २८/०१/२०२६ |